## महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


---

जा.क्रं./ प्रेस नोट / 348 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 27 / 09 / 2024

---

## 1)जबरी चोरी :—

**अर्धापूर :—** दिनांक 26.06.2024 रोजी 04.30 वा. चे सुमारास, **कारखाना भाऊराव ते येळेगाव रोडवर अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे भाऊराव कारखाना ते येळेगाव रोडवर सकाळी वॉकिंग करीत असताना यातील दोन अज्ञात आरोपीतांनी पल्सर मोटार सायकल क्रमांक एमएच/26 बी 165 यावर येवुन फिर्यादीस मोबाईल फोन काढुन दे असे धमकावले असता फिर्यादी यांनी मोबाईल फोन देण्यास नकार दिल्याने तलवार काढुन तलवारीचा धाक दाखवुन एक मोटोरोला कंपनीचा मोबाईल फोन किंमती 8,628/—रू व खिशातील नगदी 22,500/—रू असा एकुण किंमती 31,128/—रूपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी व्यंकटी रामजी कपाटे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा.येळेगाव ता.अर्धापूर जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 531/2024 कलम 309(4),3(5) भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कऱ्हाळे, मो. नं. 7057898486** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :—

**माहुर :—** दिनांक 25.09.2024 रोजी 11.00 वा.ते दिनांक 26.09.2024 रोजी 06.00 वा.चे दरम्यान **मौजे माहुर शेत शिवारात ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे गोठयात बांधलेले दोन बैल किंमती 60,000/—रूपयांचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी प्रशांत मंगल दातीर, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. बारीपुरा ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 130/2024 303(2) भारतीय न्याय संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1326, चौधरी, मो.क्रं. 9158134034** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :—

**1)लोहा :—** दिनांक 25.09.2024 रोजी 23.45 वा. चे सुमारास, **लोहा ते कंधार जाणारे रोडवर लोहा बायपास जवळ लोहा ता.लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररीत्या पाच ब्रास रेती किंमती 25,000/—रूपयाची टिपर क्रमांक एमएच—26/सीएच 2151 किंमती 35,00,000/—रूपयाचे मध्ये भरून एकुण किंमती 35,25,000/—रूपयाचा मुद्देमाल शासनाचा महसुल न भरता चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2606, श्री माधव परसराम डफडे,ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 334/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता—2023 सह कलम 48(7) म. ज. म. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2127,लाडेकर, मो.क्रं. 9423305906** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 25.09.2024 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **ओव्हरब्रीज सहयोग कॅम्पस कमानीजवळ विष्णुपुरी नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररीत्या पाच ब्रास रेती किंमती 25,000/—रूपयाची हायवा टिपर क्रमांक एमएच—20/ईजी 8335 किंमती 25,00,000/—रूपयाचे मध्ये भरून एकुण किंमती 25,25,000/— रूपयाचा मुद्देमाल शासनाचा महसुल न भरता चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2834, श्री नितीन माधवराव धुळगुंडे,. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 871/2024 कलम 303(2), 3(5) भारतीय न्याय संहीता—2023 सह कलम 48(7) म. ज. म. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2121, पांचाळ, मो.क्रं. 9011079556** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**इतवारा :—** दिनांक 25.09.2024 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **मॅफको इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपींतानी संगणमत करून फिर्यादी यांनी मोकळया जागेत उघडयावर ठेवलेले गॅस वेल्डींग सिलेडर दोन नग, स्टीलचा पत्रा, स्टील रॉड, इलेक्टीक पॅनल चेंजर, व बॅटरी असा एकुण 72,020/—रू माल टाटा गाडी क्रमांक एमएच—38/इ—2152 मध्ये भरून चोरून घेवुन जात असताना मिळुन आले वगैरे **फिर्यादी मोहमद सल्लाऊदिन मोहमदसाब, वय 60 वर्षे, व्यवसाय वॉचमन रा. मिल्लतनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 360/2024 कलम 303(2),3(5) भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/436, मोकले, मो.नं. 9423669795** हे करीत आहेत.

## 5)मो.सा.चोरी :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 25.09.2024 रोजी 20.00 ते दिनांक 26.09.2024 रोजी 08.30 वा. चे दरम्यान, **एम.एस. ऑफिस समोर विष्णुपुरी नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांची पल्सर मोटार सायकल क्रमांक एमएच.—23/बीएफ—2961 किंमती 30,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अविनाश अशोक येडे, वय 25 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. वैजाळा ता. पाटोदा जि. बीड ह.मु. विष्णुपुरी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 872/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/124 गवळी, मो.नं. 8208681527** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—** दिनांक 25.09.2024 रोजी 08.00 ते दिनांक 26.09.2024 रोजी 12.00 वा. चे दरम्यान, **हनुमानगड नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांची पल्सर मोटार सायकल क्रमांक एमएच.—26/बीएस—0165 किंमती 50,000/— रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी नागेश आबासाहेब व्यवहारे, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. डोगरगाव ता. मुदखेड जि. नांदेड ह.मु. हनुमानगड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 398/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/833, तेलंगे, मो. नं. 9527343325** हे करीत आहेत.

**3)अर्धापूर :—** दिनांक 25.09.2024 रोजी 14.20 वा. चे सुमारास, **तहसील कार्यालय पार्किंग अर्धापूर ता.अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल क्रमांक एमएच.—29/डब्लु—1435 किंमती 85,000/— रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुनिल प्रभाकरराव गोखले, वय 48 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पवननगर तरोडा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 530/2024 कलम 303(2), भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1839, कांबळे,मो.नं. 9823342366** हे करीत आहेत.

**4)भाग्यनगर :—** दिनांक 25.09.2024 रोजी 13.45 वा.ते 15.30 वा. चे दरम्यान, **सालासार कॉम्पलेक्स तरोडा नाका, जना बॅक समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्रमांक एमएच.—26/बीजे—2311 किंमती 45,000/— रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी यशवंत गंगाधर थोरात, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. सिध्दार्थनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 478/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2348, गंदमवाड मो.नं. 9881796535** हे करीत आहेत.

## 6)पोलीस असल्याची बतावणी करून फसवणुक :—

**1)अर्धापूर** :— दिनांक 25.09.2024 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मालेगाव चौक वसमत जाणारे रोडवर अर्धापूर ता.अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील दोन अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस व त्यांच्या पत्नीस पोलीस असल्याची बतावणी करून बॅकेत दरोडा पडलेला आहे. तुमच्या जवळील सोने नाणे काही असेल तर आम्हाला द्या त्यानंतर पोलीस स्टेशनला येवुन घेवुन जा असे सांगुन फिर्यादीचे अंगावर असलेली सोन्याच्या अंगठया किंमती 1,00,000/— रूपयाचा ऐवज चोरून नेऊन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी मुरलीधर मारोती मोरे, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा.वसमत जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 527/2024 कलम 318(4), 204,3(5), भा. न्या. सं.—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279, श्री चव्हाण, मो.नं. 9356283717** हे करीत आहेत.

**2)मरखेल** :— दिनांक 26.09.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **सुभाषनगर जवळ ता.देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांच्या पत्नी हे गावी जात असताना यातील दोन अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून मोटार सायकल वर येवुन

डयुटीवर असल्याचे सांगुन तुमच्या पिशवीमध्ये गुटखा आहे असे म्हणुन तपासुन औराद येथे सोन्यासाठी भांडणे झाली आहेत तुमच्या जवळील सोने काढुन द्या पिशवीत ठेवतो असे सांगितल्याने फिर्यादी व त्यांच्या पत्नी यांचे अंगावरील दोन अंगठया व पोहे हार असा एकुण किंमती 75,000/— रूपयाचा ऐवज चोरून घेऊन दोन वेगवेगळया कागदाच्या पुडयामध्ये बांधुन फिर्यादीचे पिशवीमध्ये ठेवतो म्हणुन खोटे दागिणे असलेली कागदी पुडी ठेवुन खरे दागीणे घेवुन जावुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत माधवराव बाबळगाव, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. धनगरवाडी ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 221/2024 कलम 318(2),3(5), भा. न्या. सं.—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2414, श्री गजभारे, मो.नं. 9421761460** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :—

**लोहा** :— **दिनांक 03.04.2024 रोजी 11.00 वा. चे सुमारास, मौ. पारडी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार यांचे सोबत सन 2012 मध्ये जमिनीची सौदाचिठ्ठी करून 25,00,000/—रूपये घेतले सन 2023 पर्यत जमीन नावावर करून देतो म्हणुन चाल ढकल केली व सन 2023 मध्ये जुन्या तारखेचा बॉन्ड तयार करून फिर्यादी व साक्षीदार यांची बनावट शपत पत्रावर खोटी सही करून बनावटीकरण करून शेती नावाने न करता विश्वासघात करून फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी गंगाधर अनंतराव पवार, वय 38, वर्षे, व्यवसाय शेती रा. पवार गल्ली लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 335/2024 कलम 420,406,465,467,468,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पाटील, मो. नं. 9730887298** हे करीत आहेत.

## 8)अवैध गुटखा बाळगला :—

**नांदेड ग्रामीण** :— दिनांक 25.09.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **नवी आबादी विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शरिरास अपायकारक असलेला व स्वतःचे आर्थीक फायदयासाठी विवीध कंपणीचा गुटखा, सुगंधी जर्दा व पान मसाला किंमती 27,136/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/श्री अर्जुन केशव मुंडे ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 870/2024 कलम 123, 274, 275 भा.न्या.सं—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मसपोनि/काळे, मो.क्रं. 9922391720** हे करीत आहेत.

## 9)विवाहीतेचा छळ :—

**मुखेड** :— दिनांक 10.11.2023 रोजी पासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरच्या घरी रा. उदगीर ता. उदगीर जि. लातुर येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहिस तुला स्वयंपाक येत नाही असे म्हणुन चारित्र्यावर संशय घेवुन तुझे माहेरहुन मोटर सायकल घेणेकरीता एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन तिला उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 319/2024 कलम 85, 115(2),352, 351(2), 3(5) भा.न्या.सं. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास सपोउपनि/राठोड, मो.क्रं. 9075991793** हे करीत आहेत.

## 10)प्रोव्हिबीशन :—

**1)अर्धापुर** :— दिनांक 26.09.2024 रोजी 09.15 वा. चे सुमारास, **अमोल धाबा भोकर फाटा अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू व देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 10,515/— रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/शिवशंकर कुरमय्या नंदे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 529/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215, पाटील, मो.नं. 9822857773** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर** :— दिनांक 66.09.2024 रोजी 08.40 वा. चे सुमारास, **बालाजी मंदिर गल्ली रोड अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 19,215/— रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/शिवशंकर कुरमय्या नंदे, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 528/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1074,नरवाडे, मो.नं. 9823440724** हे करीत आहेत.

## 11)अपघात :—

**देगलुर :—** दिनांक 26.09.2024 रोजी 07.00 वा. चे सुमारास, **देगलुर ते नरसी जाणारे रोडवर खानापुर जवळ ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील मयत **मुलगा नामे साईप्रसाद गंगाधर यनगुलवार, वय 20 वर्षे, रा. एकलारा ता. मुखेड जि.नांदेड** यास मोटार सायकल क्रमांक टिएस—16/इआर—3800 चे चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयतास जोराची धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी गंगाधर हुल्लाजी यनगुलवार, वय 49 वर्षे, रा. एकलारा ता. मुखेड जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 459/2024 कलम 281, 106(1), भारतीय न्याय संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2462,केंद्रे, मो.क्रं. 9923692462** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड